मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ७ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • जुलै - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

अंक ७ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • जुलै २०१९

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात (अवैतनिक) • सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर • आतिश चं. शिंदे
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे ३०
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०



## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- गुरुभक्ताचा व्यवहार ०७
- गुरुपौर्णिमा ०९
- शंभर पैकी एकशेवीस १५
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -५७ ३४
- तेजस्विनी-८७ ३७
- आरोग्याविषयी विशेष ४२
- आपले जिल्हे - वर्धा ४४
- पक्षीजगत ४७


## कथा


- विचित्र शिक्षा ०५
- सवयीचा गुलाम ०८
- सत्यकथन २०
- सत्‌शिष्य २१
- निंदेचे पातक २३
- यशामागील कष्ट ३५








## कविता


- हुशार बंडू ०६
- विनोद दिन १३
- पाणी-पाणी ४५




# गुरु साक्षात परब्रह्म

गुरुपौर्णिमेचा दिवस होता. आपल्या गुरुजींना मोठ्या प्रेमाने फूल देत राजूने विचारले, "गुरुजी, 'गुरु साक्षात परब्रह्म' असं का म्हटलं आहे ? म्हणजे तुम्ही सगळे गुरुजी देव आहात का ?" राजूच्या प्रश्नावर मंदस्मित करत गुरुजी म्हणाले, "बाळ, 'गुरु साक्षात परब्रह्म' असं सद्गुरुला म्हटलय. गुरु अनेक असतात. आई हा आपला पहिला गुरु. नंतर शाळेत शिकवतात तेही गुरुच. विद्या-कला शिकवणारेही गुरुच असतात; पण जे ईश्वराचा परिचय करुन देतात त्यांना 'सद्गुरु' म्हणतात. प्रत्येकाच्या जीवनात सद्गुरुचं स्थान फार मोठं आहे बरं..." मध्येच जिज्ञासा व्यक्त करीत त्याने विचारले, "...पण गुरुजी, सद्गुरुची जीवनात खरच गरज असते का ?"



गुरुजी म्हणाले, "होय बाळ! गुरु हे विद्या-कला शिकवून जगण्यासाठी उपजिविकेचं साधन प्राप्त करुन देतात; पण सद्गुरु हे जीवन जगण्याची कला शिकवतात. ज्ञानदृष्टीने ईश्वरदर्शन घडवतात. त्यामुळे मनुष्याच्या हातून चुका घडत नाहीत. याविषयी उध्दव आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यातील संवाद सर्वांनी ऐका." असे म्हणून गुरुजींनी उध्दव आणि श्रीकृष्ण यांचा संवाद ऐकवला.

उध्दव : देवा, तम्ही सर्वत्र आहात. सर्वांच्या हृदयात आत्मारुपाने विराजमान आहात. मग पांडवांना द्यूतक्रीडा खेळण्यापासून थांबवले का नाही ? पांडव जर द्युतात हरले नसते तर त्यांना वनवास भोगावा लागला नसता आणि द्रौपदीचा अपमानही झाला नसता.

श्रीकृष्ण : उध्दवा, या जगात प्रत्येक जण आपापल्या कर्माचे फळ भोगत असतो. प्रत्येकाला कर्म करण्याचं स्वातंत्र्य आहे. मी त्यात दखल देत नाही. मी फक्त साक्षी बनून त्यांचे कर्म पाहत असतो.

उध्दव : हे मात्र योग्य नाहीये देवा. आम्ही चुका करत राहू आणि पापाचा भार वाढत राहील. त्या पापाची शिक्षा आम्ही भोगत राहावे असं वाटतं का तुम्हाला ?

श्रीकृष्ण : नाही उध्दवा, मी सर्वसाक्षी आहे ही गोष्ट पांडव विसरले. माझ्यापासून लपवून द्यूत क्रीडेसारखा जुगार खेळायला तयार झाले. जे माझं अस्तित्व विसरतात, ते विवेकबुध्दी सोडून वागतात. चुका करतात आणि दु:ख भोगतात. मी प्रत्येकाच्या हृदयी, जळी-स्थळी उपस्थित आहे याचं ज्ञान ज्याला असेल तो मनुष्य कोणतंही चुकीचं काम करु शकत नाही. कारण माझ्यापासून कुठलीच गोष्ट लपून राहात नाही.

संवाद ऐकवून झाल्यावर गुरुजींनी मुलांना विचारले, "मुलांनो, जीवनात दु:ख कशामुळे येतं ?" दिनू म्हणाला, "आपण चुकीचं काम केलं, पाप केलं तर दु:ख येतं."

शाबास! मनुष्य चुकीचं काम केव्हा करतो ? त्याला वाटतं आपण जे काही करतो ते देव पाहत नाही. ईश्वराबद्दल अज्ञान असल्यामुळे चुका घडतात. हेडगुरुजी वर्गात असतील तर तुम्ही गडबड-गोंधळ करता का ? नाही ना! तसं ईश्वर सर्वत्र अदृश्यरुपात, निराकार रुपात उपस्थित आहे ही जाणीव आपल्याला पाप-कर्मापासून दूर ठेवते.

मित्रांनो, ईश्वराचा बोध किंवा ओळख करुन देणाऱ्या गुरुंना 'सद्गुरु' म्हणतात. सद्गुरु अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, भ्रम यापासून आपली सुटका करतात. त्यामुळे आपल्यात सद्गुणांची वाढ होऊन जीवन आनंददायी होतं. म्हणूनच म्हटलंय - 'गुरु साक्षात परब्रह्म'

- राजेंद्र थोरात






पौराणिक कथा

# विचित्र शिक्षा

पहाटेच्या वेळी महाराज श्रीराम नेहमीप्रमाणे उठले. शुचिर्भूत होऊन आपल्या धर्मासनावर विराजमान झाले. राजा हा प्रजेचा पालक असल्याने लोकांची गाऱ्हाणी ऐकून ती ते सोडवत होते. थोड्याच वेळात कुणीतरी धर्मासनाच्या द्वारापाशी येऊन थांबले. कुणीतरी तक्रार घेऊन आले असावे म्हणून श्रीरामांनी लक्ष्मणाला सांगितले, की जो कोणी तक्रार घेऊन आला असेल त्याला आत घेऊन ये.

लक्ष्मण बाहेर गेला. तेथे त्याला एक कुत्रा उभा असल्याचे दिसले. कुत्र्याला त्याने धर्मभवनात श्रीरामापाशी येण्यास सांगितले. श्रीरामांच्या आदेशानुसार कुत्रा श्रीरामांसमोर हजर झाला. त्याच्या मस्तकावर जखम झालेली होती. तो मनुष्यवाणीने बोलू लागला. आपली तक्रार करत श्रीरामांना म्हणाला, "सर्वार्थसिध्द नावाचा एक भिक्षू आहे. तो ब्राह्मणाच्या घरी राहतो. त्याने आज विनाकारण माझ्या डोक्यावर घाव घातला. त्यामुळे मला जखम झाली." कुत्र्याचे गाऱ्हाणे ऐकून घेतल्यावर श्रीरामांनी त्या ब्राह्मण भिक्षूला बोलावून घेतले व त्याला कुत्र्याला मारण्याचे कारण विचारले. त्यावर ब्राह्मण म्हणाला, "राजन्, मी



दारोदार भिक्षा मागत हिंडत असताना हा कुत्रा सतत माझ्या मार्गात आडवा येत होता. त्यामुळे क्रोध येऊन मी दंडुक्याने त्याच्यावर प्रहार केला. खरंच मी मोठा अपराध केला आहे. याबद्दल आपण द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. आपण मला अवश्य शिक्षा करावी. त्यामुळे पुढे मला नरकात जाण्याची भिती राहणार नाही."

श्रीरामांनी धर्मसभेत बसलेल्या सर्व विद्वानांना व पंडितांना प्रश्न विचारला, "विद्वतजनहो, आता तुम्हीच सांगा, या अपराधाबद्दल ब्राह्मण भिक्षूला कोणती शिक्षा द्यावी ?" धर्मसभेने काही उत्तर देण्याआधीच कुत्रा म्हणाला, "प्रभू, आपण या ब्राह्मणाला महंत बनवा. आणि काही काळाने त्याला एक मठ बांधून त्या मठाचा मठाधिपती बनवा." कुत्र्याच्या इच्छेप्रमाणे श्रीरामांनी ब्राह्मण भिक्षूला अभिषेक करुन महंत बनवले व हत्तीवर बसवून त्यास त्याच्या घरी रवाना केले. ब्राह्मण मोठ्या आनंदाने निघून गेला.

कुत्र्याला जखम करणाऱ्या ब्राह्मणाला शिक्षा सांगण्याऐवजी त्याला महंत बनवून सत्कार करायला कुत्र्याने का सांगितले याचे सर्वांना आश्चर्य वाटले. आपल्या विचित्र वागण्याचा खुलासा करीत कुत्रा पुढे म्हणाला -

"हे रघुनंदना! मी पूर्वजन्मी कालंजर या मठाचा कुलपती होतो. मी या पदावर असताना माझ्या कर्तव्यात कोणतीही चूक केली नाही. माझा धर्म मी काटेकोरपणे पाळला. इतके प्रामाणिक राहूनही मला जर कुत्र्याचा जन्म लाभला. या अधम योनीत मी आलो. तर मग या क्रूर आणि मूर्ख ब्राह्मणाला मठाधिपती केले, तर तो काय-काय उत्पात करील हे सांगायलाच नको. त्यामुळे तोच काय पण त्याच्या सात पिढ्या नरकात जातील. त्यामुळे त्याच्यासाठी हीच मोठी शिक्षा असेल असे मला वाटते."

कुत्र्याच्या तोंडून हे स्पष्टीकरण ऐकून सगळ्यांचे डोळे आश्चर्याने विस्फारले.

क्रमशः

❖❖❖

# हुशार बंडू

सुंदरशा टुमदार घरात
बंडू बालक होतं छान
ठरवतात मम्मी-पप्पा
त्याच्या भवितव्याचे प्लॅन

पप्पा म्हणती मम्मीला
होईल बंडू मोठा डॉक्टर
खूप खूप मिळवून पैसा
सुंदर बनवील अपुलं घर

मम्मी म्हणते पप्पांना
बनवू याला मोठा वकील
किंमत शब्दा-शब्दांची
पैसाच पैसा हा छापील

कुशाग्र बुद्धीचा बंडू
होता चतुर फार हुशार
टी.व्ही. अन् पेपरमधले
वाचतसे नेहमी समाचार

बंडू म्हणे मम्मी-पप्पा
व्यवसायिक हे पोटार्थी
उपकारी थोडे असती
बहुतांशी असती स्वार्थी

मम्मी पप्पा ऐका मला
आधी व्हायचंय मानव छान
नागरीक आदर्श असा
राखण्यास देशाची शान

❖❖❖



# गुरुभक्ताचा व्यवहार



बाऊ महादेवसिंहजी

बाऊ महादेवसिंह नावाचे गुरुभक्त संत निरंकारी मिशनमध्ये होऊन गेले. ते म्हणत, की गुरुभक्ताने लोभ, लालसा, मोह, अभिमान तसेच सांसारिक प्रलोभनांपासून स्वत:ला दूर ठेवणं आवश्यक असतं. यासाठीच गुरुमताचा हा सिध्दांतच आहे, की सेवा, सत्संग, नामस्मरणाबरोबरच गुरुचरणी अर्पण केलेल्या पैशांचा वापर स्वतःच्या वैयक्तिक कामासाठी करु नये. गुरुच्या आदेशाचं पालन जसंच्या तसं केलं पाहिजे. कारण गुरुचा आदेश टाळणं हे दु:ख आणि संकटांना आमंत्रण दिल्यासारखं आहे. बाऊजींनी हे सिध्दांत स्वत:च्या जीवनात आधी धारण केले होते.

महापुरुषांनी केलेल्या नमस्काराची माया किंवा सेवा रुपाने दिलेली माया यातील एक पैसादेखील चुकूनही आपल्या कुटुंबासाठी खर्च करु नका. मायेची ही लालसा गुरुसिखाला अजिबात लाभदायक ठरत नाही. गुरुघरची ही माया आपल्या वैयक्तिक खर्चाच्या मायेमध्ये जर जमा केली तर प्रभुने आम्हाला वैयक्तिक रुपात दिलेली मायादेखील आमच्या जवळ टिकत नाही. ती सुखकारक नसते. ह्या सिध्दांतावर बाऊजी स्वत:देखील शेवटपर्यंत ठाम राहिले.

एकदा बाऊजींचे सुपुत्र गोबिंदसिंहजी प्राथमिक शाळेत शिकत असताना त्यांना त्यांच्या मातोश्री रोज एक टक्का (रुपयाचा ३२ वा भाग, म्हणजे एक आण्याच्या निम्मे) खर्चायला देत. एके दिवशी त्यांच्या मातोश्री घरी नव्हत्या. त्यांनी बाऊजींकडे नेहमीचे पैसे खर्चायला मागितले. बाऊजी म्हणाले, "माझ्याकडे तर पैसे नाहीत, माझ्या खिशात जेवढी माया आहे ती सर्व गुरुची माया (नमस्कारीची) आहे." परंतु त्यांनी अधिकच हट्ट केल्यामुळे बाऊजींनी त्या मायेतला एक टक्का गोविंदसिंहजींना दिला खरा, पण त्यांच्या मातोश्री घरात पाऊल ठेवत नाही तोच त्यांनी तो एक टक्का त्यांच्याकडून मागून घेतला आणि लगेच नमस्कारीच्या मायेत जमा केला.

सांगण्याचा भावार्थ हाच आहे, की गुरुप्रति सेवा रुपाने समर्पित केलेली माया काही काळासाठी देखील उधार घेऊ आणि मग त्याची भरपाई नंतर करु असा विचारदेखील करायचा नाही. अशी शिकवणच जणू या प्रसंगातून दिली आहे.

दुसऱ्याच्या धनाचा वापर करण्याचा मोह अनेकदा आपल्याला होतो. पण ते धन आपण त्या व्यक्तीला वेळेवर परत करु शकलो नाही तर नातेसंबंध बिघडतात. सत्संगापासून आपण दुरावले जातो. आपसात वैर-द्वेष निर्माण होऊन मानसिक स्वास्थ्यही बिघडते. त्यामुळे आपला व्यवहार हा स्वच्छ आणि प्रामाणिक असावा, हेच खरे!

- रंजना भांगरे, मुलुंड (पूर्व)





कथा :

# सवयीचा गुलाम

माकडांचा खेळ दाखवणाऱ्या एका मदाऱ्याकडे 'जुप्पी' नावाचे एक माकड होते. मदारी डमरु वाजवू लागला की, जुप्पी नाच करायचे, कोलांट्या उड्या मारायचे आणि प्रेक्षकांसमोर थाळी घेऊन फिरायचे. प्रेक्षक त्यात पैसे टाकत. जुप्पीमुळे मदाऱ्याची चांगली कमाई होत होती. मदारी मात्र स्वतः केळी खायचा व साली जुप्पी माकडाला खायला द्यायचा. कलिंगडचा लाल गाभा स्वतः खायचा व साली जुप्पीला खायला द्यायचा. जुप्पीला वाटायचे मालकाने मलाही केळे द्यावे, कलिंगड द्यावे, पण तसे घडत नव्हते. एकदा मदाऱ्याने दोन पेरु विकत घेतले आणि स्वतःच खाऊन टाकले. जुप्पीला सालीसुध्दा दिल्या नाहीत.

जुप्पी माकडाला राग आला, त्याने गळ्यातली दोरी तोडली आणि जंगलात पळून गेला. झाडावरची फळे खाऊ लागला. त्याने बोरे, सिताफळे खाल्ली व संध्याकाळी झाडावरच झोपले.


त्या झाडावर माकडांचा एक कळप होता. ती सर्व माकडे इतरत्र गेली होती. संध्याकाळ होताच ती त्या झाडावर आली. पाहतात तो काय, गळ्यात दोरी बांधलेले माकड. त्यांनी जुप्पीला हलवून विचारले, 'तू कोण?

(पान १० वर)

विशेष

# गुरुपौर्णिमा

आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतात. ज्या महर्षी व्यासांनी महाभारत लिहिले ते गुरुंचे गुरु होत. ते भारत वर्षाचे गुरु मानले जातात; म्हणून या दिवशी व्यास महर्षिंना वंदन करण्याची प्रथा आपल्या हिंदू संस्कृतीत आहे. गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हाचा उद्देश गुरुपौर्णिमा साजरा करण्यात असतो. निदान वर्षात एकदा तरी गुरुची आठवण व्हावी यासाठी गुरुपौर्णिमेचे आयोजन केले जाते. महर्षि व्यासांनी महाभारत, श्रीमत् भागवत, अठरा पुराणे, वेद, उपनिषद यातील तत्वज्ञान सूक्ष्म करुन जिज्ञासू व्यक्तींसाठी त्याची व्यवस्थित रचना करण्याचे महान कार्य केले. त्यांनी रचलेला 'महाभारत' हा ग्रंथ एवढा प्रचंड तसाच सर्वस्पर्शी आहे की महाभारतात जे नाही ते जगात कोठेही नाही. तसेच त्यात जे आहे ते सर्व जगात आहे. ज्याप्रमाणे भूमितीत व्यास म्हणजे वर्तुळातील महत्तम त्याप्रमाणे त्यांचे लिखाणही तसेच महत्तम असेच आहे. सभेत बोलणारा वक्ता ज्या पीठावर (स्टेजवर) उभा असतो त्याला 'व्यासपीठ' म्हणतात. म्हणून तेथे उभे राहून बोलणाऱ्या वक्त्यालाही व्यासाप्रमाणे त्यांच्याविषयाचे परिपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. व्यासांना आदिगुरुही मानतात. गुरुस्मरण हे खरे तर गुरुच्या सद्‌गुणांचे स्मरण होय. गुरुचे पूजन हे केवळ देह पूजन नसते तर ते एक तत्वपूजन असते.



कोणत्याही सभेत किंवा कार्यक्रमात गुरुसमोर इतरांनी उच्च स्थानावर कधीही बसू नये.

गुरुकृपायोगात म्हटले आहे-

गुरुर्ब्रह्मा: गुरुर्विष्णु<br>
र्गुरुर्देवो महेश्वर:।<br>
गुरु साक्षात परब्रह्म<br>
तस्मै श्री गुरवे नम:।

म्हणून आपणही आज सर्वजण याप्रसंगी गुरुंना वंदन करु या. गुरुशिवाय आयुष्यात कुणीही मार्गदर्शक नसतो. लहानपणी आई-वडील, विद्यार्थीदशेत शिक्षक तर म्हातारपणी संत महात्मे गुरुस्थानी असतात, मार्गदर्शक असतात.

महाभारत हे व्यासांनी सांगितले व गणपतीने लिहून घेतले कारण गणपती हे आद्य लघुलेखक होते. पण गणपती एका अटीवर लिहिण्यास तयार झाले, ती अट



अशी की व्यासांनी मजकूर सांगताना थांबायचे नाही; तर व्यासांची प्रतिअट अशी होती की गणपतीने ते सर्व अर्थ समजून लिहायचे अशा रितीने महाभारत लिहिले गेले. पण ते ज्या पीठावर लिहिले गेले ते पीठ इतके महान ठरले की त्या पीठाला 'व्यासपीठ' ही संज्ञा प्राप्त झाली.

इ.स. पूर्व ३१०० मध्ये म्हणजे आज जवळजवळ ५००० वर्षांच्याही आधी यमुना नदीच्या काठी राहणाऱ्या सत्यवती नामक एका धीवर कन्येच्या पोटी व्यास नावाच्या एक पुत्र रत्नाने जन्म घेतला. हाच व्यास पुढे व्यास मुनी, व्यास महर्षी होऊन भगवान व्यास या महत्पदापर्यंत पोहोचला. व्यासांच्या पित्याचे नाव पराशर मुनी. हेही मोठे तपस्वी. पुत्रजन्माआधीच पराशरमुनी तपसाधनेसाठी हिमालयात गेले. व्यासांनी आपल्या पित्याचा शोध घेतला आणि कालांतराने हस्तिनापुराजवळ सरस्वती नदीकिनारी स्वतःचा आश्रम स्थापन केला. व्यास कृष्णवर्णी (काळे) आणि द्विपात जन्मले म्हणून त्यांना 'कृष्णद्वैपायन' असे देखील म्हणत.

रक्ताच्या नात्याने व्यास हे कौरव-पांडवांचे मूळ पुरुष. कौरव-पांडवातील वैर नाहीसे होऊन भारतीय युध्द प्रसंग टाळण्याची त्यांनी पराकाष्ठा केली. व्यासांचे कर्तृत्व आकाशाहून उत्तुंग आणि विश्वाहून विशाल. त्यांनी विस्कळीत प्राचीन पुराणांचे सुयोग्य संकलन करुन व्यवस्थित वर्गीकरण केले. त्यातूनच १८ पुराणांची निर्मिती झाली. विश्वश्रेष्ठ महाकाव्य 'महाभारत' ग्रंथ लिहून त्यातील युध्द, कपट-कारस्थानं, संहार आदी घटनांच्या वर्णनाने व्यास व्यथित झाले म्हणून नारदमुनींच्या सल्ल्याने त्यांनी 'श्रीमद्भागवत' या महापुराणाची रचना केली.

❖❖❖

# सवयीचा गुलाम

(पान ८ वरुन)

कुठून आलास ?'

मग जुप्पीने सर्व कहाणी त्या रानटी माकडांना ऐकवली व म्हणाले, 'मालकाने माझी खूप उपासमार केली. स्वतः केळी, कलिंगड खायचा न् मला साली द्यायचा. म्हणून मी जंगलात पळून आलो.'

'तुला मालकाने कसरती शिकवल्या असतील ना ?'

'हो ! मी उलट्या सुलट्या गिरक्या घेतो. नाच करतो आणि थाळी घेऊन भीक मागतो.'

'एवढंच शिकवले तुला ? एका मोठ्या माकडाने विचारले.'

'आता आम्ही तुला एक धडा शिकवतो. तो निष्ठुर मालक कधी भेटला तर तू त्याला तो शिकव.' वृध्द माकड म्हणाले आणि त्याने एक सणसणीत चपराक जुप्पी माकडाला मारली. जुप्पी गाल चोळू लागला. तसे मोठे माकड म्हणाले, 'माकडाच्या जातीत जन्माला येऊन भीक मागायला शिकलास आणि हा धडा मात्र विसरलास.'

'आता मी कधीही विसरणार नाही.' जुप्पी म्हणाला.

मोठ्या माकडाला दया आली. त्याने त्याच्या गळ्यातील दोरी कुरतडून काढली व जुप्पीला बंधमुक्त केले.

इकडे माकड पळून गेल्याने मदारीची उपासमार होऊ लागली. मदारी मनात म्हणाला, 'जुप्पी जाऊन जाऊन कुठे जाणार, जंगलातच ना! त्याला चुटकीसरशी शोधून काढेन.'

मदारी जंगलात गेला व बासरी वाजवून डमरुचा 'कडकम् कडकम्' असा आवाज काढू लागला. बोरीच्या झाडावर बसलेली इतर माकडे सावध झाली. त्यांनी फांद्या घट्ट धरुन ठेवल्या; पण डमरुच्या आवाजाचा गुलाम झालेले जुप्पी माकड मात्र झाडावरच अंगात आल्यासारखे नाचू लागले व नाचता नाचता धप्पकन् खाली पडले आणि मदाऱ्यामागोमाग नाचत गेले.

तेव्हा मोठे रानटी माकड इतर माकडांना म्हणाले, 'याला कितीही समजावले तरी हा ऐकणारा नव्हताच. कारण तो सवयीचा गुलाम झाला आहे.'

❖❖❖



# दादाला विचारु या

प्रश्न : दु:खी कोण असतं ?

उत्तर : ज्या माणसाला स्वत:ची प्रशंसा आणि दुसऱ्याची निंदा प्रिय वाटते तसेच ज्याला स्वत:साठी सुखाची इच्छा आहे आणि दुसऱ्यासाठी दु:खाची इच्छा आहे असा मनुष्य सदैव दु:खी असतो.बाह्य गोष्टींनी मनुष्य दु:खी होत नसून त्याच्या वृत्ती-प्रवृत्ती त्याला दु:खी करत असतात.

❖❖❖❖❖❖

प्रश्न : दान-पुण्य करणारा, सदाचरणी, परोपकारी अशा सज्जनाला परमात्म्याच्या प्राप्तीची काय गरज आहे ? तो तर स्वत:च देवासारखा आहे.

उत्तर : मनुष्यजन्म हा अतिशय दुर्लभ आहे. या जन्मात चांगल्या गोष्टी अवश्य कराव्या; परंतु हा जन्म केवळ परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मिळालेला आहे. हा उद्देश आधी साध्य करावा. दान-पुण्य, परोपकार इ. मुळे पुण्यांचा संचय वाढेल. पुण्य अधिक वाढले तर स्वर्गसुखाचे भोग वाट्याला येतील. पण जन्म-मरणाच्या बंधनातून सुटका होणार नाही. यासाठी आपल्या मूळ स्वरुपाला जाणून या मूळ तत्त्वाशी एकरुप होणे हाच शाश्वत सुखाचा एकमेव उपाय आहे. त्यामुळे कोणी कितीही श्रेष्ठ सज्जन असला तरी त्याला परमात्मा प्राप्ती करणे गरजेचे असते.

❖❖❖❖❖❖

प्रश्न : साधू, संत आणि संन्यासी यांच्यात काय फरक आहे ?

उत्तर : काहीही फरक नाही. साधू-संन्यासी म्हटला, की घरदार नसलेली, भगवी वस्त्र आणि गळ्यात झोळी अडकवून भिक्षा मागणारी व्यक्ती, आणि संत म्हटला, की संसारात राहणारी; पण टिळे-माळा धारण करुन सतत कथा-कीर्तन-प्रवचन करणारी व्यक्ती, अशी आपली आणि समाजाचीही धारणा आहे. परंतु ही साधु-संत-संन्याशाची परिभाषा नाही. साधू-संत-संन्यासी ही एक आंतरिक अवस्था आहे. दैनंदिन जबाबदाऱ्या व गृहस्थ धर्माचं कर्तव्य पार पाडत असताना कुठल्याही गोष्टीत आसक्त न होता मन-चित्त-बुध्दी ईश्वराभिमुख असणाऱ्या सज्जनाला साधू-संत-संन्यासी म्हटले आहे. संसारात ज्याला आसक्ती नाही आणि संसारापासून जो विरक्त नाही अशा अनासक्त भावाने जीवन जगणारा तो खरा संन्यासी. राजा जनक राजविलासी जीवन जगत असतानाही त्यांच्यात अंतर्यामी संन्यस्त वृत्ती होती.

❖❖❖❖❖❖



# विचारपुष्प



आपण हजारो वर्षांच्या पाठीमागे जाऊन धर्म आणि अध्यात्माची कोणतीही गोष्ट पाहिली तर तेव्हा जे सत्य होते तेच आजच्या तारखेलाही सत्य आहे की, आपण यथार्थ मानव बनावे, आपण परोपकाराविषयी श्रवण करावे आणि परोपकाराविषयीच बोलावे. आज सत्संगामध्ये वारंवार World Without Walls (भिंतीविरहित जग)चा संदेश घुमत होता कारण आपण स्वतःला संकुचित बनवले आहे. ही धरती किती विशाल आहे; पण आपण अगोदर देशांच्या सीमा आखल्या मग राज्यांच्या सीमा तयार केल्या आणि पुढे जाऊन आपल्या घरांनाही कुंपण घातले. त्यामुळे आपण स्वतःला मर्यादित परिघामध्ये सीमित करत चाललो आहोत. आपण जर घरातील एका खोलीमध्ये स्वतःला कोंडून घेतले तर बाकी आमचे घर कितीही मोठे असले तरी परीघ केवळ त्या छोट्याशा खोलीपुरताच मर्यादित होऊन जातो. अशाचप्रकारे निवड करण्याची संधी आपल्याजवळ असतानाही आपण आपल्या बुद्धीमध्ये स्वतःसाठी अगदी अरुंद जागा तयार करतो. दगडापासून आपण भिंत तयार करायची अथवा पूल तयार करायचा याची निवड आपल्यावर आहे. दोघांना लागणारे मटेरियल (साहित्य) सारखेच आहे. पूल बांधला तर आपण पलिकडे जाऊन एकमेकांशी हस्तांदोलन करु शकतो, एकमेकाची गळाभेट घेऊ शकतो. पण तेच जर आपण आपल्या छोट्याशा परीघामध्ये राहिलो तर स्वतःही त्रास सहन करतो आणि आमचे वर्तनही चिडचिडे होते. आपण स्वतःसाठी



एक नकारात्मक कुंपण घालतो आणि इतरांचेही नुकसान करत असतो.

जेव्हा आपल्या शरीरातील एखादा अवयव खराब झाला तर आपण मोठ्या प्रयासाने त्याच्यावर इलाज करुन घेतो. आपला तो अवयव लवकर बरा व्हावा म्हणून तशा प्रकारचा व्यायाम करतो. अगदी अशाचप्रकारे जर आमच्यामध्ये प्रेम, नम्रतेची कमतरता असेल तर स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सत्संग करणे अनिवार्य आहे. एकदा ब्रह्मज्ञान घेतले म्हणजे मुक्ती निश्चित झाली असे नाही. अंतिम श्वासापर्यंत आपण या ब्रह्मज्ञानावर टिकून राहिलो तरच मुक्ती शक्य आहे आणि आपण टिकून तेव्हाच राहू शकू जेव्हा नियमितपणे आपण सत्संग करत राहू.

संपूर्ण दिवस आपण काहीही करत असलो तरी दिवसभरात आपण नास्मरण तर करुच शकतो. आपण त्यांच्यामध्ये निरंकाराला पाहून त्यांची सेवा करावी, जेणेकरुन सदोदित आपण स्वतःला self-correction mode (स्वसुधार मोड) वर ठेवू शकू. कुठेही आपण कोणतीही गोष्ट करत असू तेव्हा हा निरंकार प्रभु आपल्या अंगसंग आहे याची जाणीव ठेवावी. जर आपण जाणूनबुजून चूक केली असेल तर त्यावेळी आपण निरंकार प्रभुला विसरुन गेलो आहोत, निरंकारापासून खूप दूर गेलो आहोत (हे निश्चित).

आपण स्वतःला जास्तीत जास्त योग्य ठेवायचे आहे. माहीत असूनही मी समोरच्याशी एखादी गोष्ट बोलावी आणि त्याचे मन दुखावले जावे अशावेळी स्वतःला थांबवावे आणि दुसऱ्याशी असे शब्द बोलूच नयेत ज्यामुळे त्याला त्रास होईल. इतरांसाठी कटू शब्द बोलून आपण आपले तोंडही कडू करु नये.

❖❖❖



# विनोद दिन

सहज सोप्या शब्दांना
चढवी जो शृंगार
खळखळून हसवी तो
विनोदाचा षटकार

सभा असो वा गप्पा
परिवर्तित करी वातावरण
ऐकण्यास शब्दांच्या कोटी
आतुरती श्रवण

महान असे विनोदी
अत्रे होऊन गेले
तसे विनोद करण्या
सारे सरसावले

जीवनात प्रत्येकाच्या
नेहमी हवा विनोद
दुःख कष्ट झटकवून देतो
वेगळा एक आनंद


हसत राहा हसवीत राहा
नेहमी राहा आनंदी
सदैव प्रयास करत राहा
व्हाल तुम्ही विनोदी

- सुरेश तिर्लोटकर



# शब्दकोडे
## १८०

❍ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)



## आडवे शब्द

१. इजिप्त हा देश या खंडात आहे.
२. ..... या देशाची राजधानी कोलंबो आहे.
५. १९८३ च्या क्रिकेट वर्ल्ड कप विजेत्या संघाच्या कर्णधाराचे नाव.
७. पिकांना ..... लागू नये म्हणून त्यावर जंतूनाशके फवारतात.
८. 'डिस्कवरी ऑफ इण्डिया' या पुस्तकाचे लेखक ....... नेहरु होते.
१२. बाळगंगाधर टिळकांचा जन्म ....... जुलै १८५६ साली झाला.
१४. अफगाणिस्तानची राजधानी
१६. ..... या वाद्यास मंगल वाद्य म्हणतात.

## उभे शब्द


१. आईची नणंद
३. निरंकारी पुरुष सेवादलचे पायमोजे कोणत्या रंगाचे असतात?
४. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन अस्तित्वात येणारा नवा जिल्हा
५. न जुळणारा शब्द : अर्जुन, कलवा, द्रौपदी, विदुर
६. महात्मा गांधी हे पेशाने ..... होते.
८. भारताच्या राष्ट्रचिन्हाखाली हे बोधवाक्य लिहिले आहे : सत्यमेव .......
९. न्यूयॉर्क शहर कोणत्या नदीवर आहे? (गोदावरी/हडसन)
१०. आवडता, कौतुकाचा
११. भारताचे पहिले शीख राष्ट्रपती झानी ....... सिंग होते
१३. शंभर वजा साठ भागिले दोन
१५. संत निरंकारी मिशनचा पाया बाबा ....... सिंह जी यांनी रचला.



व्यक्ति विशेष

# शंभर पैकी एकशेवीस

कॉलेजच्या परीक्षेचा काळ सुरु होता. नुकताच गणिताचा पेपर झाला होता. मधली सुट्टी झाल्यानंतर विद्यार्थी कँटीनकडे न जाता आज तावातावाने प्राध्यापकांच्या स्टाफरुमकडे निघाले होते. रागावलेल्या विद्यार्थ्यांचा हा मोर्चा स्टाफरुममध्ये घुसला. त्यांनी गणिताच्या प्राध्यापकांना गाठलं! चक्क घेरावच घातला त्यांना. सगळ्यांची एकच तक्रार होती. कालचा गणिताचा पेपर फारच अवघड होता. शिवाय वीस मार्कांचे प्रश्न हे पुस्तकाबाहेरील अभ्यासक्रमातले होते. तक्रारीत तथ्य होतेच. शेवटी प्राध्यापक त्या विद्यार्थ्यांना म्हणाले, 'ठीक आहे, तुमचं म्हणणं काय आहे?', एक जण म्हणाला, सर, तुम्ही सैल हातानं पेपर तपासावेत आणि ती जी काही वीस मार्कांची गणितं अभ्यासक्रमाबाहेरची आली आहेत, त्यांचे वीसच्या वीस गुण सरसकट सर्वांना देऊन टाकावेत. सर विचारात पडले. ते म्हणाले, त्याचं काय आहे, तुमच्या म्हणण्याप्रमाणं तुम्हाला वीस गुण सरसकट दिले असते. पण...,



जयंत नारळीकर

'पण काय सर? काही प्रॉब्लेम आहे का?' सर म्हणाले, मुलांनो! तुम्ही म्हणता तसं जर मी केलं, तर तुमच्यातल्या एका मुलाला शंभरपैकी एकशेवीस गुण द्यावे लागतील मला!,

मुले चक्रावली. हे कसं शक्य आहे? गोंधळलेल्या मुलांकडे मिस्कील नजर टाकून सर म्हणाले, मुलांनो, हा पहा तो पेपर. एकही चूक नाहीये यात. अगदी अभ्यासक्रमाबाहेरील वीस गुणांच्या प्रश्नातही चूक नाही. तुमच्याच वर्गातल्या जयंताचा हा पेपर आहे.

मोर्चातल्या विद्यार्थ्यांना रिकाम्या हातानं परत फिरावं लागलं हे सांगायला नकोच! पण हे मात्र सांगायलाच हवं, की हा जयंत कोण?मित्रांनो, जयंत म्हणजेच जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ जयंत नारळीकर होय!!

❖❖❖





# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा








तिथे जाताच विनयने आपल्या खोड्या चालू केल्या. आजूबाजूचे लोक रोजच त्याच्या तक्रारी घेऊन आजोबांकडे येऊ लागले.
आजोबा विनयला जवळ बोलावून समजावत; त्यावेळी विनय कान पकडून माफी मागे. परंतु काही वेळाने पुन्हा खोड्या चालू करायचा.
एके दिवशी कंटाळून आजोबा विनयला घेऊन आपल्या बागेत गेले. तिथे जाऊन त्यांनी विनयला एक रोपटे उपटायला सांगितले.


विनयने ते पटकन उपटले. त्यानंतर आजोबांनी त्याला त्यापेक्षा अजून एक मोठे रोपटे उपटायला सांगितले. विनयने थोडा जोर लावून तेही रोपटे उपटले.
दुसरे रोपटे उपटल्यावर विनय फारच खूश होऊन नाचू लागला आणि म्हणाला, आजोबा माझ्यात आता खूप ताकद आली आहे. मी काहीही करु शकतो.
आता आजोबांनी त्याला एक मोठे झाड उपटायला सांगितले. विनयने खूप जोर लावला परंतु ते झाड तो उपटू शकला नाही.


विनय धापा टाकत म्हणाला, आजोबा हे झाड उपटणे फार कठीण आहे. याच्यासाठी मला खूप मेहनत करावी लागेल.
आजोबा म्हणाले, विनय अशाच प्रकारे आपल्या सवयी असतात. त्या सुरुवातीला सोडणे सहज शक्य आहे. परंतु त्याची मुळे आपल्या स्वभावात खोलवर गेली म्हणजे या मोठ्या झाडाप्रमाणे त्या उपटणे किंवा सोडणे फार कठीण जाते. बेटा, तू सुध्दा आपल्या या वाईट सवयी सोडू शकतोस. कारण तू अजून लहान आहेस. तू एक चांगला मुलगा बनू शकतोस
विनयने आता प्रण केला की, ‘यापुढे मी कधीही खोड्या काढणार नाही एक गुणवान मुलगा बनणार.’ आजोबांच्या या शिकवणीमुळे विनयचे जीवनच बदलून गेले. त्यानंतर तो एका चांगल्या मुलासारखा वागू लागला.





कथा


# सत्यकथन

आपण एक सुविचार अनेकदा वाचतो, 'नेहमी खरे बोलावे.' परंतु खरं बोलल्याने कधी-कधी आपलं नुकसानही होतं. असं असलं तरीही असत्याचा विजय तात्पुरता आनंद देतो; पण शेवटी सत्याचाच विजय होतो. शिवाय सत्य बोलल्याने आपल्या मनावर कसलंही ओझं राहात नाही. असत्य कथन करुन मिळालेलं यशही कसं नुकसानदायी ठरतं याची ही कथा आहे.

महाभारताच्या महायुध्दाची लक्षणं दिसू लागली होती. पांडवांमध्ये अर्जुन हा धनुर्विद्येत पारंगत होता. सर्व शस्त्र-अस्त्रांचं त्याला ज्ञान होतं. कर्णही उत्तम धनुर्धर होता; पण त्याच्याकडे महाविनाशक ब्रह्मास्त्र नावाचं अस्त्र नव्हतं. कौरव-पांडवांमध्ये होणाऱ्या महायुध्दात कर्ण कौरवांच्या बाजूने लढणार हे ठरलेले होते. पांडवांशी युध्द करताना अर्जुनाला टक्कर देण्यासाठी, एनकेन प्रकारे त्याचा पराभव करण्यासाठी कर्णाने ब्रह्मास्त्र विद्या प्राप्त करण्याचा निश्चय केला. ही विद्या प्राप्त करण्यासाठी कर्ण महेंद्र पर्वतावर वास्तव्य करणाऱ्या महर्षी परशुरामांकडे गेला. महर्षी परशुराम ब्रह्मास्त्र विद्या केवळ ब्राह्मणांनाच शिकवत असत. कर्ण हा क्षत्रिय होता. त्याने परशुरामांना आपण क्षत्रिय

(पान २२ वर)

# सत्शिष्य



गुरुदेव अद्वैत आपल्या आश्रमाची जबाबदारी एखाद्या योग्य शिष्यावर सोपवून वानप्रस्थानासाठी निघण्याची तयारी करत होते. आपला उत्तराधिकारी होण्यास कोण योग्य आहे याची ते चाचपणी करतच होते. सरतेशेवटी दोन शिष्यांमधून एकाची निवड करायचे ठरवले. त्यांनी सुजय आणि सुयश या दोघा शिष्यांना घरी पाठवून दिले आणि निरोप मिळताच परत यायला सांगितले.

दोघेही आपापल्या घरी गेले. दोन-तीन दिवसांनी एका शिष्यामार्फत दोघांनाही त्वरीत निघून येण्याचा निरोप गुरुदेवांनी पाठवला. त्यासाठी त्यांनी निश्चित वेळही सांगितली. गुरुदेवांचा निरोप मिळताच दोघेही आश्रमात पोचले; परंतु सुजय आधी पोहचला. त्यानंतर काही वेळाने सुयश पोचला. तो धापा टाकत आला होता. त्याचे कपडे चिखलाने माखलेले होते. त्याने उशिरा आल्याबद्दल गुरुदेवांची क्षमा मागितली. परंतु गुरुदेव मात्र रागावले. उशिरा येण्याचे कारण न विचारता त्याला म्हणाले, आधी नदीवर जाऊन स्वच्छ आंघोळ करुन ये मग तुला काय शिक्षा करायची ते ठरवू.

सुजय मनातल्या मनात खूश झाला. आता सुयशला काय शिक्षा होणार याची तो उत्सुकतेने वाट पाहू लागला. स्नान आटोपून सुयश भीत-भीतच खाली मान घालून गुरुदेवांसमोर उभा राहिला. गुरुदेवांनी सर्व शिष्यांसमोर एक घोषणा केली, "माझ्या प्रिय शिष्यांनो, आजपासून माझ्या आसनावर मी सुयशला बसवून आश्रमाची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर सोपवत आहे.



तुम्ही सर्वांनी त्याच्या आदेशाचे पालन करा.”

सुयश गोंधळला. त्याला काही कळेना. गुरुदेव आपली चेष्टा करताहेत की काय हे समजेना. तेवढ्यात सुजय तावातावाने पुढे येत म्हणाला, “गुरुदेव, जो स्वतः आदेशाचं पालन करत नाही, वेळेचं मूल्य जाणत नाही, त्याचे आदेश आम्ही कसे पाळावे ?”

गुरुदेवांनी मोळीवाल्या आजींना हाक मारली. आजीबाई आल्यावर त्यांनी सुजयला विचारलं, “ह्या आजी तुला वाटेत भेटल्या होत्या, त्यांनी जड मोळी उचलून डोक्यावर ठेवायला मदत कर म्हणून तुला विनंती केली, मग तू काय केलंस ?”

सुजय म्हणाला, हो पण उशिर होईल म्हणून मी थांबलो नाही. त्यानंतर गुरुदेवांनी बैलगाडीवानाला बोलावले आणि ते म्हणाले, या गाडीवानाच्या बैलगाडीचे चाक चिखलात रुतले होते, यांनी तुझ्याकडे मदतीची याचना केली होती. तू त्यांना चाक बाहेर काढण्यास मदत केलीस ?

सुजय म्हणाला, नाही, कारण माझे कपडे खराब झाले असते.

त्यावर गुरुदेव म्हणाले, “जो समोर आलेली सेवेची संधी टाळतो, दुसऱ्याच्या अडचणी, कष्ट समजून घेत नाही, आपले कपडे घाण होण्याची चिंता करतो, दुसऱ्याला अडचणीत टाकून निघून जातो तो इतरांना काय मार्गदर्शन करणार ? मात्र सुयशने ते काम केलं. इतरांच्या व्यथा समजून घेणारं मन ज्याच्याकडे आहे, सेवेचा भाव आहे, तोच या दैवी सेवाकार्यात जबाबदारीच्या पदावर बसण्यास योग्य आहे.”

गुरुदेवांच्या या शब्दांच्या फटकाऱ्याने सुजयला आपली चूक कळून चुकली. त्याने गुरुदेवांची क्षमा मागत सुयशच्या आदेशांचं यापुढे पालन करु असे आश्वासन दिले आणि गुरुदेव समाधानाने वानप्रस्थानासाठी निघून गेले.

❖❖❖

# सत्यकथन

(पान २० वरुन)

असल्याचे सांगितले नाही. आपले खरे कुळ-गोत्रही सांगितले नाही. आपण ब्राह्मणपुत्र आहोत असे खोटे सांगून गुरुगृही प्रवेश मिळवला. मन लावून गुरु परशुरामांची त्याने सेवा केली आणि ब्रह्मास्त्र विद्या प्राप्त केली.

एकदा गुरु परशुराम कर्णाला म्हणाले, मी थोडा वेळ वामकुक्षी (झोप) घेतो. तू मला वारा घाल. कर्णाने गुरुदेवांचे मस्तक आपल्या मांडीवर ठेवले व तो त्यांना वारा घालू लागला. तेवढ्यात एक भुंगा कर्णाच्या मांडीखाली शिरला. मांडीची हालचाल केली तर गुरुदेवांची झोप मोडेल म्हणून त्याने मांडी हलवली नाही. भुंगा हळूहळू त्याची मांडी पोखरु लागला. कर्णाला असह्य वेदना होत होत्या; पण तो तसाच बसून राहिला. थोड्या वेळाने गुरुदेव परशुरामांची झोप पूर्ण झाली. ते उठून बसले, तेव्हा कर्णाच्या मांडीखालून रक्ताचे ओघळ वाहताना त्यांना दिसले. भुंगा मांडी पोखरत असतानाही हूं की चूं न करणारा, एवढी खोल जखम सहन करणारा हा खरा ब्राह्मण नाही, हे परशुरामांच्या लक्षात आलं. त्यांचा राग अनावर झाला. त्यांनी कर्णाला शाप दिला. ‘तू आपल्या गुरुशी खोटं बोलून जी विद्या मिळवलीस, ती ऐनवेळी तुला उपयोगी पडणार नाही. युध्दात ज्याच्याविरुध्द तू ही विद्या वापरशील त्याचवेळी तुझ्या रथाचे चाक जमिनीत गाडले जाईल.’

ती भयंकर शापवाणी ऐकून कर्ण व्यथित मनाने घरी परतला. ज्यावेळी महाभारताचे महाभयंकर युध्द झाले तेव्हा अर्जुनावर ब्रह्मास्त्र सोडताना त्याच्या रथाचे चाक भूमीत गाडले गेले आणि अर्जुनाकडून कर्ण मारला गेला.

सांगण्याचा भावार्थ, खोटं बोलण्याचा परिणाम हा शेवटी दु:खातच होतो. म्हणूनच नेहमी खरे बोलावे !

❖❖❖





# निंदेचे पातक

शेख सादी हे फारसी भाषेचे अत्यंत श्रेष्ठ कवी होते. त्याकाळी ही प्रथा होती की हज यात्रेत मध्यरात्री उठून सर्व यात्रेकरु नमाज पढायचे.

हज यात्रेत शेख सादी व त्यांच्या वडिलांनी मध्यरात्री उठून काही लोकांसोबत नमाज पढली, परंतु काही यात्रेकरु झोपूनच राहिले.

हे पाहून शेख सादी आपल्या वडिलांना म्हणाले, "हे कसे नालायक आणि हीन दर्जाचे लोक आहेत, नमाज पढायलाही उठले नाहीत; झोपूनच राहिले."

वडील गंभीर होत म्हणाले, "खबरदार! असं बोलू नकोस. हेच बरं झालं असतं, की तूसुध्दा झोपूनच राहिला असता आणि नमाज पढली नसती. कोणाचे अवगुण पाहून त्याची निंदा आणि घृणा करणे हे तर त्याहूनही मोठं पाप आहे."

शेख सादी यांच्या वडिलांनी त्यांना जो उपदेश दिला तो फारच सारगर्भित आहे.

निंदा किसी की हम किसीसे
भूलकर भी ना करें।
ईर्ष्या कभी भी हम किसीसे
भूलकर भी ना करें।।

आपल्याला कोणाचीही निंदा करण्याचा अधिकार नाही. परनिंदा खूप मोठे पाप आहे. जो परनिंदा करतो त्याचे स्वत:चेच मन मलिन होते. कोणी कसाही असो, आपण त्याची निंदा करता कामा नये. आपण तर स्वत:लाच अगोदर सुधरवलं पाहिजे. निंदा करणाऱ्याने कितीही भक्ती केली, सेवा-सत्संग-स्मरण केले तरी ते फलदायी ठरत नाही. म्हणूनच सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी म्हटले आहे, निंदा करनेवाले सैंकडो में कमाते है, लेकिन हजारो में गवाते है। (निंदा करणारे शेकड्याने कमावतात; पण हजारोने गमावतात.)

❖❖❖



# शेंगदाणे



शेंगदाणे खाण्यामुळे आरोग्याला १२ जबरदस्त फायदे मिळतात.

★ रोज भिजलेले शेंगदाणे खाणे आरोग्यासाठी लाभदायक असतात. आरोग्य विषयक अनेक समस्यांवर भिजवलेले शेंगदाणे खाणे गुणकारी आहे. शेंगदाणे भिजवून खाण्यामुळे यामध्ये असलेले न्यूट्रिएंटस आणि आयरन ब्लड सर्कुलेशन व्यवस्थित ठेवून हृदयाबरोबरच अनेक आजारात बचाव करते.

शेंगदाणे हे गरिबांचे काजू आहेत असे म्हटले जाते. खरे तर यामध्ये चवीसोबत आरोग्याला फायदे देणारे अनेक गुण असतात. यामध्ये प्रोटीनचे प्रमाण मांसाच्या तुलनेत १.३ पट, अंड्याच्या तुलनेत २.५ पट आणि फळांच्या तुलनेत ८ पट जास्त असते.

१०० ग्राम शेंगदाण्यात १ लीटर दुधाएवढे प्रोटीन असते. हे आयरन, नियासिन, फोलेट, कॅल्शियम आणि झिंक यांचे चांगले स्त्रोत आहे.

थोड्या शेंगदाण्यात ४२६ कॅलरीज, ५ ग्राम कार्बोहायड्रेट्स, १७ ग्राम प्रोटीन आणि ३५ ग्राम फॅट असते. यामध्ये विटामिन ई, के आणि बी६ पण भरपूर असते.

## भिजलेले शेंगदाणे खाण्याचे फायदे :

★ भिजलेले शेंगदाणे ब्लड सर्कुलेशन कंट्रोल करुन शरीराला हृदयरोगापासून वाचवतात.

★ यामध्ये असलेले कॅल्शियम, विटामिन अे आणि प्रोटीन मसल्स टोंड करण्यास मदत करते.

★ रोज भिजलेले शेंगदाणे खाल्ल्यामुळे ब्लड शुगर कंट्रोल राहते. यामुळे तुम्ही डायबिटीजसारख्या आजारापासून वाचता.

★ शेंगदाणे फायबरने भरपूर असल्याने भिजवून खाण्यामुळे पचन तंत्र चांगले राहते. थंडीत याचे सेवन केल्यामुळे शरीराला आतून गरमी आणि उर्जा मिळते. यामध्ये पोटॅशियम, मॅग्नीज, कॉपर, कॅल्शियम, आयरन, सेलेनियम गुणांनी भरपूर असलेले शेंगदाणे भिजवून रिकाम्या पोटी खाण्यामुळे गॅस आणि ॲसिडीटी समस्या दूर होतात.

★ थंडीमध्ये भिजलेले शेंगदाणे आणि गूळ खाण्यामुळे सांधेदुखी आणि कंबरदुखी या समस्या दूर होतात.

★ लहान मुलांना सकाळी भिजलेले शेंगदाणे खायला दिल्यामुळे त्यांना विटामिन ६ मिळते ज्यामुळे डोळ्यांची नजर चांगली राहते आणि स्मरणशक्ती चांगली होते.

★ शेंगदाणे खाण्यामुळे शरीरातील रक्ताची कमी दूर होते. याचसोबत शरीराला उर्जा आणि स्फूर्ती मिळते.

★ शेंगदाण्यात असलले तेल ओला खोकला आणि भूक न लागणे या समस्या दूर करते.

★ रोज मुठभर शेंगदाणे खाण्यामुळे महिला कॅंसरपासून दूर राहतात. कारण यामध्ये असलेले अँटीऑक्सीडेंट, आयरन, नियासिन, फोलेट, कॅल्शियम आणि झिंक शरीराला कॅंसर सेल्सशी लढण्यास मदत करतात.


★ शेंगदाणे नियमित खाणे गर्भवती महिलांच्यासाठी पण चांगले असते. हे गर्भाच्या वाढीसाठी मदत करते.

★ जेवणानंतर जर ५० किंवा १०० ग्राम शेंगदाणे खाल्ले तर बॉडी बनते, भोजन पचते, रक्ताची कमी होत नाही. तसेच यामध्ये प्रोटीन, फॅट, फायबर, खनिज, विटामिन आणि ॲन्टीऑक्सीडेंट असते.

★ शेंगदाणे खाण्यामुळे त्वचा चांगली राहते.

❖❖❖





# लाभदायी अर्धनौकासन

कंबरेचं दुखणं आजकाल अनेकांना सतावत असतं. याचं मुख्य कारण आहे बैठी जीवनशैली. त्यामुळे कंबरेचं दुखणं दूर करणारी काही आसनं आपण आतापर्यंत पाहिली आहेत. आज आणखी एका आसनाबद्दल जाणून घेऊ. त्याचं नाव आहे अर्धनौकासन. हे आसन कंबरेचं दुखणं दूर करण्यासाठी खूप उपयुक्त ठरतं. कंबरेचे स्नायू आखडले असतील तर ते या आसनामुळे मोकळे होतात. हे आसन केल्यामुळे स्लिप ा डि स्टा ङ , सायटिकाचं दुखणं आणि कंबरेचं दुखणं ही दुखणी हळूहळू दूर होऊ लागेल. मज्जारज्जूंचं कार्य चांगल्या प्रकारे सुरु ठेवणं यामुळे शक्य होतं. शरीराचा आकार साधारणपणे नौकेसारखा होत असल्यानं त्याला अर्ध नौकासन असं म्हटलं जातं.

**काय काळजी घ्याल?** हर्निया असेल, पोटावर काही शस्त्रक्रिया झाली असेल, आतड्यामध्ये जखम असेल किंवा पेप्टिक अल्सर असेल तर हे आसन करु नये.

**कसं कराल?** पोटावर झोपा. त्यानंतर दोन्ही हात डोक्यावरुन पुढे सरळ करा. आता डावा हात कोपरापासून वाकवून डोक्याच्या खाली ठेवून द्या. उजवा हात सरळ समोर असेल. पाय एकमेकांना जोडलेले असतील. श्वास भरुन घेत डाव्या हातावर दबाव टाका. उजवा हात आणि डोकं वरच्या बाजूला उचला. त्याबरोबरच डावा पायही वर उचला. श्वासोच्छ्वासाची गती सामान्य असू द्या. आसनाच्या या स्थितीमध्ये थांबा. नंतर हळूहळू हात आणि पाय परत जमिनीवर घेऊन या. अशा प्रकारे हात आणि पाय बदलून हे आसन करा. अशा प्रकारे बदल करत दिवसातून किमान तीन वेळा हे आसन करा.

❖❖❖





# वाढदिवसाच्या



ऋत्विज



निर्गुण धावरे



स्वराज रोडगे



अथर्व ढाले



शरयु गायकवाड



शुभनित साळुंखे



ईश्वरी जाधव



# हार्दिक शुभेच्छा





स्पृहा मुळे



आदर्श गुरव



ईश्वरी राऊत



स्वयम जाधव



अर्णव व प्रांजल राऊत



सर्वेश कांबळे



नमिश जामखांडे



ओवी चराडे






# भवानगड

**किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग**

**जिल्हा : पालघर**

पश्चिम रेल्वेवर असलेल्या केळवेचा समुद्रकिनारा मुंबईकरांमध्ये प्रसिध्द आहे. या केळवे गावापासून ३किमी अंतरावर भवानगड हा छोटेखानी किल्ला आहे. वसई मोहिमेदरम्यान पोर्तुगिजांवर वचक बसविण्यासाठी मराठयांनी या किल्ल्याची निर्मिती केली होती. दरवर्षी शिवरात्रीला या गडावर भवानगडेश्वराची यात्रा भरते.

## इतिहास :

इ.स. १५२६ साली पोर्तुगिजांनी वसई किल्ल्याची उभारणी सुरु केली. त्याच बरोबर या भागावर वर्चस्व ठेवण्यासाठी शिरगाव, माहीम, केळवे या परिसारात किल्ल्यांची साखळीच तयार केली. पोर्तुगिजांनी स्थानिक जनतेवर धर्मांतरासाठी अत्याचार केले. या जुलमाच्या तक्रारी पेशव्यांकडे गेल्यावर, इ.स.१७३७ मध्ये नरवीर चिमाजी आप्पांच्या नेतृत्वाखाली सरदार पोर्तुगिजांचे समूळ उच्चाटण करण्यासाठी पुढे सरसावले.

वसई मोहिमेत १७३७ च्या ऐन पावसाळ्यात २००० मजूरांकडून भवानगडाची उभारणी करण्यात आली. दांडाखाडीच्या रक्षणासाठी हा किल्ला बांधण्यात आला होता. वसई मोहिमेत या किल्ल्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

## पहाण्याची ठिकाणे :

भवानगड छोट्या झाडीभरल्या टेकडीवर उभा आहे. पायथ्यापासून १० मिनिटात आपण भवानगडाच्या भग्न प्रवेशद्वारातून माचीवर प्रवेश करतो. माचीची तटबंदी मोठ मोठे दगड एकमेकावर रचून केलेली आहे. किल्ल्याच्या ऊभारणीत



चुन्याचा वापर केलेला आढळत नाही. गडाच्या माचीवर भवानगडेश्वराचे जिर्नोध्दारीत मंदिर आहे.

गडाच्या बालेकिल्ल्याचे पश्चिमाभिमुख प्रवेशद्वार गोमुखी पध्दतीचे आहे. याची कमान ढासळलेली आहे. परंतु बाजूचे बुरुज व तटबंदी शाबूत आहेत. बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या बांधकामात मात्र चुन्याचा वापर केलेला आढळतो. प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूस पहारेकऱ्यांसाठी देवड्या आहेत. तेथून पुढे गेल्यावर दुसऱ्या उध्वस्त प्रवेशद्वारातून आपला बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. समोरच पाण्याचे चौकोनी आकाराचे खडकात बांधलेले टाके दिसते. त्याच्या बाजूने गावकऱ्यांनी सिमेंटचा कट्टा बांधलेला आहे. टाक्यात भरपूर पाणी साठा आहे .

बालेकिल्ल्यांचा परिसर दाट झाडीत लपलेला आहे. टाक्याच्या ऊजव्या बाजूस असलेल्या तटबंदीवरून गडफेरी चालू करावी. तटबंदीच्या उत्तर-पूर्व बाजूने एक पायवाट खाली उतरते. या वाटेवर डाव्या बाजूस दगडात खोदलेल्या दोन गुहा दिसतात त्यांचा उपयोग धान्य साठविण्यासाठी केला जात असावा, ही पायवाट पुढे दांडपाड्यात जाते. आपण आल्या वाटेने परत तटबंदीवर जाऊन गडफेरी पूर्ण करावी. भवानगडावरुन दांडाखाडी व आजुबाजूचा विस्तृत प्रदेश दिसतो.

**पोहोचण्याच्या वाटा :**

१) पश्चिम रेल्वेवरील केळवे किंवा सफाळे या स्थानकांवरुन भवानगड सारख्याच अंतरावर आहे. सफाळे स्थानकात उतरुन दातिवरे गावात जाणाऱ्या बसने मधुकरनगर स्टॉपवर उतरावे येथून दीड किमी वर भवानगड आहे.

२) केळवे स्थानकात उतरुन ६ आसनी रिक्षाने केळवे गावात यावे. गावातील चौकातून डाव्या हाताचा रस्ता दांडाखाडी ओलांडून दांडा गाव, खटाली गाव या मार्गे भवानगडाला जातो. हे अंतर ३ किमी आहे. या मार्गाने केळवे पाणकोट, फुटका बुरुज, कस्टम किल्ला, दांडा किल्ला पहात भवानगडाला जाता येते.

**राहाण्याची सोय :**

गडावरील भवानगडेश्वर मंदिरात रहाण्याची व्यवस्था होऊ शकते.

**जेवणाची सोय :**

गडावर जेवणाची व्यवस्था नाही, पण केळवे गावात आहे.

**पाण्याची सोय :**

गडावर पाण्याची बारामाही व्यवस्था आहे.

**सूचना :**

भवानगड, दांडा किल्ला, फुटका बुरुज, कस्टम किल्ला, केळवे पाणकोट, केळवे भुईकोट, माहिमचा किल्ला, शिरगावचा किल्ला हे सर्व किल्ले एका दिवसात पाहून होतात; परंतु यासाठी समुद्राच्या भरती ओहोटीची वेळ माहित असणे फार महत्वाचे आहे. कारण केळवे पाणकोट केवळ ओहोटीच्या वेळी पहाता येतो.

जर ओहोटी सकाळी असेल तर प्रथम केळवे पाणकोट पहावा. नंतर दांडा किल्ला, भवानगड पाहून परत केळवेत यावे. जेवण करुन केळवे भुईकोट, माहिमचा किल्ला, शिरगावचा किल्ला पाहून पालघरला जावे.

❖❖❖



# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न :- कचऱ्यातून लोखंडी पदार्थ कसे वेगळे करतात ?

उत्तर :- कचऱ्यात लोखंडी पदार्थ असतात. ते वेगळे करण्यासाठी कचरा पसरुन ठेवतात. त्यावर मोठे विद्युत चुंबक असलेले क्रेन फिरवतात. विद्युत प्रवाह चालू करताच त्याला लोखंडी पदार्थ चिकटतात. कचरा मात्र तसाच खाली राहतो. चिकटलेले लोखंड दुसरीकडे नेऊन प्रवाह बंद करतात. त्यामुळे लोखंड खाली पडते. ते नंतर गोळा करतात.

प्रश्न :- काम बंद असताना सोनार विस्तवाचे निखारे राखेने का झाकतात ?

उत्तर :- सोनार लोकांना जळत्या निखाऱ्याचे वारंवार काम पडते. ते जर जळतच ठेवले तर लवकर संपून जातील. जर पाण्याने विझविले तर पुन्हा लवकर पेटणार नाहीत. म्हणून काम बंद असेपर्यंत त्यावर राख टाकून ठेवतात. राखेमुळे निखाऱ्यांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडतो. काही निखारे विझतात व काही अर्धवट पेटलेले राहतात. जेव्हा काम करावयाचे असेल त्यावेळी त्यांच्यावरची राख झटकून त्यावर हवा फुंकली म्हणजे ते ताबडतोब पेटतात. पूर्णपणे विझलेले निखारेसुध्दा गरम असल्याने लवकर पेटतात.

प्रश्न :- कॅरम खेळण्यापूर्वी कॅरम बोर्डावर बोरीक पावडर का टाकतात ?

उत्तर :- कॅरम खेळताना कॅरमच्या सोंगट्यावर स्ट्रायकरने आघात केला असता त्या सोंगट्या विशिष्ट दिशेने गतिमान होणे आवश्यक असते. त्याकरिता कॅरम बोर्ड व सोंगट्या यामधील घर्षण किमान राखण्याकरिता दोघांचेही पृष्ठभाग गुळगुळीत करावे लागतात. त्याकरता कॅरम खेळ्यापूर्वी गुळगुळीत असणाऱ्या बोरीक पावडरची भुकटी पसरतात.


प्रश्न :- कापूर किंवा आयोडीनचे स्फटिक हवेत उघडे ठेवल्यास का नाहीसे होतात ?

उत्तर :- कापूर किंवा अयोडीन यांचे सामान्य तापमानाला हळूहळू संप्लवन होत असते. म्हणजेच ते स्थायुरुप अवस्थेतून एकदम वायुरुप अवस्थेत जातात. म्हणून कापूर किंवा आयोडिनचे स्फटिक घट्ट झाकणाच्या शिशीत बंद करुन ठेवतात.

❖❖❖



# सर्वोत्तम लक्ष्य



★ आज जगामध्ये दबाव टाकून शिस्त शिकवली जाते, पण दबावाने कधी सुधारणा होऊ शकत नाही. हृदयात जोपर्यंत भाव असत नाही, तोपर्यंत कोणतंच परिवर्तन होऊ शकत नाही. जगामध्ये ज्या वाईट गोष्टी आहेत किंवा कुरीती आहेत, त्या समाप्त करण्याची जगाची पद्धत अशी आहे की, त्यांना वाईट-साईट बोलावं, त्यांच्याशी वैर-विरोध करावा. अशा भावनांनी युक्त होऊन कितीही प्रयत्न केला तरी हे प्रश्न आहे तिथेच राहतात. हो, दुसऱ्यांना प्रेमाने विनंती करुन त्यांची मनं जिंकल्याने या सर्व वाईट गोष्टी दूर होऊ शकतात. महापुरुषांमध्ये हीच विशेषता असते. अन्यथा जगामध्ये आणि गुरमुख महापुरुषांच्या बाह्य रचनेमध्ये कोणताच फरक नसतो.

★ महापुरुषांनी आपल्यासमोर नेहमी एकच लक्ष्य ठेवले आहे. जीवनात अनेक प्रकारची उद्दिष्टे असतात. तिथपर्यंत पोचण्यासाठी अनेक प्रयत्न, उपद्व्याप करावे लागतात, धडपड करावी लागते. काही लोक ते लक्ष्य साध्यही करतात. परंतु जीवनात जे सर्वोत्तम लक्ष्य आहे, सर्व धर्म, ग्रंथ, वेद-शास्त्रांनी ज्या लक्ष्याप्रति इशारा केला आहे, माणूस नेमका त्याच लक्ष्यापासून दूर जात आहे. त्याच्यासाठी ध्यान, उत्साह, जागृती नसते. गुरु पीर-पैगंबरांनी युगानुयुगे त्या लक्ष्यापर्यंत पोचण्यासाठी स्वत:चं जीवन प्रस्तुत केलं आहे, सर्वांसाठी साधन बनले आहेत. कारण हा जन्म व्यर्थ जाऊ नये.

– युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज







भूगोलाचे शिक्षक : मुलांनो, पाणी जपून वापरा. अन्यथा एक दिवस असा येईल, की त्या दिवशी पृथ्वीवरील सारी जीवसृष्टी नष्ट होऊन जाईल. पृथ्वीवर कुणीच जीवंत राहणार नाही.
बन्या : सर, त्या दिवशी शाळेला सुट्टी राहील ना ?

पोलीस : (चोरांना) आम्ही तुम्हाला चारी बाजूंनी घेरलंय....
चोर : चला, मग गरबा खेळू या.

चिंटूची मामी : (नव्या शेजारणीला) बरं का ताई, पलीकडच्या शीला काकूंपासून सावध राहा. एक नंबरची खोटारडी आहे. तिच्या बोलण्यावर अजिबात विश्वास ठेवू नका.
शेजारीण : बरं झालं बाई, तुम्ही मला सावध केलंत! आत्ताच येऊन गेल्या त्या!
चिंटूची मामी : असं, काय म्हणत होत्या त्या ?
शेजारीण : त्या म्हणत होत्या, की चिंटूची मामी खूप चांगली आहे.

गुरुजी : गण्या, या जगात देश किती आहेत ?
गण्या : एकच देश आहे, भारत!
गुरुजी : (संतापून) आणि मग अमेरिका, इंग्लंड, पाकिस्तान हे काय आहेत ?
गण्या : ते तर सगळे विदेश आहेत ना!

बकुळामावशी : (पतीला) धनी, तुम्ही माझ्याबरोबर फिरायला येताना धोतरावर पिवळा सदरा घालत जाऊ नका गडे!
बाबुराव काका : का ? काय झालं ?
बकुळामावशी : अवं, माझ्या मैत्रीणी म्हणतात, काय मग आज 'वरण-भात' वाटतं!





# हसा मुलांनो हसा




हिंदीचे शिक्षक : मुलांनो, मी तुम्हाला डिक्टेशनसाठी हिंदीची वाक्ये सांगतो, ती तुम्ही वहीत लिहा.
शिक्षक : 'दिल्ली में लाल किला है और कुतुबमिनार भी है।' झालं ?
मुले : हो सर!
शिक्षक : बन्या वाचून दाखव बरं!
बन्या : दिल्ली में लाल केला है और कुत्ता बिमार भी है।

गिऱ्हाईक : आंबे कसे दिले ?
दुकानदार : पाचशे रुपये डझन!
गिऱ्हाईक : अरे वा, छान! असं करा मला सडलेले आणि खराब झालेले आंबे द्या.
दुकानदार : सडलेले ?
गिऱ्हाईक : हो हो, जेवढे असतील तेवढे द्या.
दुकानदार : (सडलेले, खराब आंबे निवडून त्याच्यापुढे ठेवत) हे घ्या.
गिऱ्हाईक : आता राहिलेल्या आंब्यातून एक डझन आंबे द्या. हे घ्या पाचशे रुपये!
दुकानदार : आणि ह्या सडलेल्या आंब्याचे ?
गिऱ्हाईक : ते अजून चांगले सडू द्या. मी ते कचऱ्यात टाकायला माणूस पाठवतो.

बंड्या : आई, तू दुपारी म्हणाली होतीस, रात्रीच्या जेवणात दोन ऑप्शन आहेत... इथं तर एकच भाजी दिसतेय.
आई : दोन ऑप्शन आहेत ना... एक म्हणजे... खायचं तर खा, दुसरं म्हणजे... नाहीतर उपाशी राहा.

सुंदराबाई - काल मी गाण्याचा रियाज करायला बसले आणि तुमच्या कुत्र्याने भुंकायला सुरुवात केली. मला अजिबात रियाज करता आला नाही.
शेजारी - अहो पण त्यात आमच्या टॉमीचा काय दोष ? सुरुवात तर तुम्हीच केली होती ना.





समर्थ दर्शन : भाग - ५७

# हुरडा

शके १५८० मध्ये निजानंदस्वामींच्या पुण्यतिथी-करिता समर्थांची स्वारी कऱ्हाडला गेली होती. तेथून निगडीला जाऊन रंगनाथस्वामींची भेट घेऊन ते परळीस यायला निघाले. बरोबर पंचवीस-तीस शिष्यमंडळी होती. दोन प्रहर झाले तेव्हा मंडळींना भूक लागली. सभोवार शाळवाचे पीक लागलेले असून कोवळा लुसलुसीत हुरडा तयार झालेला होता. सर्वांनी समर्थांना विनंती केली, "हुरडा भाजून खाण्यास सर्वांना आज्ञा व्हावी."

त्यावर समर्थ म्हणाले, "तुम्ही साऱ्यांनी एकाच शेतातील हुरडा खाल्ला तर मालकाचा फडशा पाडाल. ह्याकरिता प्रत्येक शेतातून दहापाच, दहापाच कणसे काढून जमा करा आणि मग एके ठिकाणी बसून खा."

त्या आज्ञेप्रमाणे शिष्य मंडळींनी प्रत्येक शेतातून दहापाच कणसे काढून जमा केली. देगावच्या नजीक आल्यावर तेथील पाटलाच्या शेतात विहीर चांगली आहे असे पासून एका वृक्षछायेखाली समर्थांना बसायला आसन घालून दिले. सर्व मंडळी हुरडा भाजून तयार करुन चोळून समर्थांना देऊ लागली. हे कृत्य शेताचा मालक, देगावचा पाटील ह्याने नजीक असलेल्या चावडीवरुन पाहिले. रागारागाने धावत येऊन त्याने कोणताही विचार न करता, हाच गोसावडा ह्यांच्यातील प्रमुख आहे असे समजून हुरड्याची ताटे पडली होती त्यांचा जुडगा घेऊन समर्थांच्या पाठीवर जोराने तीन फटके मारले. हे मंडळींनी पाहाताच त्याला त्यांनी धरले आणि ते मारु लागले.

तेव्हा समर्थ म्हणाले, "त्याला मारु नका. त्याच्याच शेतातला हुरडा खाऊन त्याच्याच शेतात बसून त्याला मारणे उचित नाही. सोडा त्याला."

तेव्हा मंडळींना पाटलाचा मनस्वी संताप आला होता. तरी समर्थांच्या आज्ञेप्रमाणे सोडणे भाग पडले. नंतर मंडळी समर्थांसह उठून साताऱ्याकडे जाण्यास निघाली व पाटीलही आपल्या गावात गेला. समर्थ माहुलीच्या संगमावर गेले. ही बातमी कळताच शिवाजीमहाराजांनी मोठ्या समारंभाने त्यांना साताऱ्यास नेले व वाड्यामध्ये स्वतः मंगलस्नान घालू लागले. तेव्हा स्वामींच्या पाठीवर वळ असलेले दृष्टीस पडले. ते पाहून शिवाजीमहाराजांना फार आश्चर्य वाटले.

"हे वळ कसले ?" म्हणून त्यांनी समर्थांना प्रश्न केला. समर्थांनी त्याचे काहीच उत्तर दिले नाही. भोजनोत्तर समर्थांनी जेव्हा शयन केले, तेव्हा शिवाजीमहाराजांनी शिष्य-मंडळींना 'वळ कसले', म्हणून प्रश्न केला. कारण, त्याबद्दल त्यांच्या मनाला फारच हुरहूर लागून राहिली होती. अखेर नाही होय करता करता शिष्यांनी पाटलाची सर्व हकीकत राजेश्रींना निवेदन केली. मग काय विचारता ? जे सद्गुरु देवापेक्षा, प्राणापेक्षा प्रिय असे छत्रपतींनी मानलेले, त्यांच्या पाठीवर सामान्य पाटलाने फटके मारले, हे ऐकून शिवाजी महाराज क्रोधाने संतप्त झाले. लागलीच ढालाइतास बोलावून आणून हुकूम फर्मावला, "आत्ताच्या आता देगावच्या पाटलाच्या मुसक्या बांधून त्याला मारीत मारीत येथपर्यंत घेऊन यावे."

क्रमशः





कथा

# यशामागील कष्ट

स्पेनमध्ये जन्मलेले पिकासो हे एक महान चित्रकार होते. त्यांच्या कलाकृती जगभर कोट्यावधी रुपयांना विकल्या जात असत. एके दिवशी ते रस्त्यावरुन चालत असताना एका महिलेने त्यांना ओळखले आणि त्यांच्याजवळ येऊन तिने विचारले, “सर, मी तुमची खूप मोठी फॅन आहे. तुम्ही काढलेली चित्रं मला फार आवडतात. तुम्ही माझ्यासाठी एक पेंन्टिग बनवून द्याल का?”

पिकासो हसले आणि म्हणाले, “चित्र काढण्यासाठी आता माझ्याकडे काहीच साहित्य नाही. नंतर कधीतरी तुमच्यासाठी पेन्टिंग बनवून देईन.”

ती महिला खूपच आग्रह करु लागली. आत्ताच पेंन्टिग बनवून द्या. परत तुमची भेट होईलच याची



मला खात्री वाटत नाही.

त्या महिलेचा आग्रह त्यांना मोडता येईना. मग त्यांनी खिशातून एक कागद काढला आणि पेनाने त्यावर काही काढू लागले. केवळ दहाच सेकंदात त्यांनी एक कामचलाऊ चित्र काढलं. त्या महिलेला ते म्हणाले, "हे पहा तुमच्यासाठी बनवलेलं चित्र. याची किंमत लाखो डॉलर आहे."

ती ते पेंन्टिग घेऊन घरी आली. तिला वाटलं की, पिकासो आपल्याला मूर्खात काढत आहेत. या पेंन्टिगची किंमत लाखो डॉलर असणे शक्यच नाही. मग ती चित्रकलेतील तज्ज्ञ व्यक्तींकडे गेली. चित्रांची खरेदी-विक्री करणाऱ्या एजंटकडे चौकशी केली. सगळ्यांनी ते चित्र लाखो डॉलर किंमतीचे असल्याचे सांगितले. हे ऐकून तिला खरोखरच मोठं आश्चर्य वाटले. ती परत पिकासोंकडे गेली. पेंन्टिगची किंमत खरोखरच लाखो डॉलर आहे. त्यावर पिकासो म्हणाले, ते तर मी आधीच सांगितलं होतं. ती म्हणाली, सर मला तुमची विद्यार्थिनी व्हायचंय आणि पेंन्टिग शिकायचं आहे. तुम्ही ज्याप्रमाणे दहा सेकंदात लाखो डॉलर किंमतीची पेंन्टिग बनवली त्याप्रमाणे मला बनवता यावीत असं मला वाटतं.

पिकासो हसले आणि म्हणाले, मी दहा सेकंदात जी पेंन्टिग बनवली ती शिकण्यासाठी मला ३० वर्षे लागली. तू देखील आयुष्यातील तीस वर्षे खर्च केलीस तर तुलाही अशी पेंन्टिग बनवता येतील. ती महिला अवाक होऊन त्यांच्याकडे पहात राहिली.

तात्पर्य, जेव्हा आपण दुसऱ्याचं यश बघतो तेव्हा असं वाटतं की, अरेच्या, या व्यक्तीला तर खूपच लवकर आणि सहजपणे यश मिळालं आहे; पण त्या यशामागे किती वर्षांचे कष्ट आहेत हे जाणून घेण्याची कुणाचीही इच्छा नसते.

यश तर मिळते पण त्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागलेला असतो. यश मिळण्याच्या तयारीतच निम्मे आयुष्य खर्च करावे लागते. ज्या व्यक्ती स्वत: कष्ट करुन, संघर्ष करुन, चिकाटीने वाटचाल करत राहतात त्या यशस्वी होतात आणि इतरांना वाटते की, त्यांना सहजपणे यश मिळालेले आहे.

परीक्षेतील प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी फक्त तीन तासांचा अवधी देण्यात आलेला असतो. पण त्या तीन तासासाठी वर्षभर अभ्यास करावा लागतो. यशासाठी सातत्यपूर्ण कष्ट आणि चिकाटीची गरज असते. चिकाटीने वाटचाल करत राहिलो तर यशापासून कुणीही रोखू शकणार नाही.

– रंजना भांगरे, मुलुंड (पूर्व)

❖❖❖



# देशभक्त सासू-सून

देशासाठी बलिदान केलेल्या अनेक स्त्रिया आहेत. काहींची नोंदही इतिहासात नाही तर काही प्रसिध्दीस आलेल्या नाहीत. अशाचपैकी होत्या दोन महिला. सन १८५७ चे स्वातंत्र्ययुध्द भारतभर सुरु झाले. प्रत्येक देशवासी इंग्रजांविरुध्द लढायला सिध्द झाला होता. अनेक राजे, संस्थानिकही या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले होते. असंच कर्नाटकातील धारवाड मधील एक छोटंसं संस्थान होतं - नरगुंद. भास्करराव भावे हे तेथील संस्थानिक. भास्कररावांची आई यमुनाबाई आणि पत्नी पार्वतीबाई या दोघांनीही १८५७च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन इंग्रजांविरुध्द युध्द करण्याची प्रेरणा श्रीमंत भास्करराव भावेंना दिली. त्यांचा पाठिंबा मिळताच भावेंनी युध्द घोषित केलं. इंग्रज रेसिडेंट मॅन्सन याने नरगुंद संस्थानावर हल्ला चढवला; पण भावेंनी तो हल्ला परतवून लावला व मॅन्सनला फाशी दिले. ही बातमी ऐकताच कर्नल माल्कम जेकबने मोठ्या सैन्यानिशी नरगुंदाच्या किल्ल्याला वेढा दिला. बरेच दिवस भावेंनी किल्ला लढवला; पण किल्ल्यातील धान्यसाठाही संपत आल्याने अधिक काळ किल्ला लढवणे शक्य होणार नाही या विचाराने भास्करराव भावे निवडक माणसांसह गुप्त वाटेने पत्नी आणि आईला घेऊन निसटले. अनेक दिवस जंगलात लपून-छपून काढले. इंग्रज सैनिक त्यांना पकडण्यासाठी त्यांच्या मागावर होतेच. अनेक दिवस त्यांनी वनवासात काढले. पत्नी आणि आई सोबत असल्याने भास्कररावांनाही इंग्रजांविरुध्द काही हालचाली करता येत नव्हत्या. इंग्रजांच्या भीतीने लोक त्यांच्या पत्नी आणि आईला कुठे आसराही देत नव्हते. असल्या जगण्याचा त्या दोघींनाही कंटाळा आला होता. शिवाय भास्कररावांनाही इंग्रजांविरुध्द हालचाली न करता आपल्यामुळे अडकून राहावे लागते या गोष्टींचा विचार करुन त्यांनी आत्मबलिदानाचा निर्णय घेतला. यमुनाबाई आणि पार्वतीबाई या सासू-सुनांनी भल्या पहाटे उठून मलप्रभा नदीमध्ये जलसमाधी घेतली.

या दोघींनी स्वातंत्र्यसंग्रामात जरी प्रत्यक्षपणे सहभागी भाग घेतला नाही तर निर्भयपणे आत्मबलिदान दिले. व भास्कर भावेंना स्वातंत्र्यसंग्रामासाठी मुक्त केले त्यांच्या आत्मबलिदानातून संस्थानातील सर्व नागरिकांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली.

❖❖❖



# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




वा, वा, किट्टी आपण सर्वजण मिळून प्रथमच जाणार आहोत, आपण खूप खूप मज्जा करायची.
चला लवकर नाहीतर वेळ होईल.
आजी, आम्ही आलो. आम्ही आंब्याच्या बागेत फिरायला जाऊ ?
त्यात विचारायचं काय ? जा फिरुन या.


अरे वाव, आंबेच आंबे!
यातले आंबे जर मित्रांना दिले तर कमी होतील.
वा, हे सर्व आंबे मी एकटीच खाणार.
अरे, किट्टी किती स्वार्थी आहे! आम्हाला एकही आंबा देत नाही.
किट्टी, आम्ही चाललो हं!
हो, हो, तुम्ही जा सर्व मी जाईन एकटी घरी.


धडाम!
वाचवा - वाचवा
अरे किट्टी, तू पडलीस कशी?
चल, तुला घरी घेऊन जातो.
काकू, किट्टी पडले.
सॉरी मित्रांनो, या आपण सर्व मिळून आंबे खाऊ या.
सॉरी आई, मी या मित्रांना आंबे दिले नाहीत. मी यांच्याशी वाईट वागले, तरीसुध्दा यांनी मला मदत केली. याच्यापुढे मी असं करणार नाही. कोणतीही वस्तू सर्व मिळून वाटून खाईन.



# बाबा सज्जनसिंहजी

मित्रांनो, कधी कधी या धरतीवर अशा व्यक्ती जन्म घेतात, ज्या सागराहून अथांग, पर्वताहून उंच आणि गंगेहून पवित्र असतात. फुलाचा सुगंध तर त्याच दिशेला जातो ज्या दिशेने वारा वाहतो. परंतु महात्म्यांच्या सद्‌गुणांचा सुगंध तर चहूकडे पसरत जातो. असचं एक महान व्यक्तिमत्व होतं, **बाबा सज्जनसिंहजी**!



बाबा सज्जनसिंहजींनी धरतीवर अल्पच आयुष्य व्यतीत केलं; परंतु या अल्पायुष्यात त्यांनी हेच सिध्द करुन दाखवलं, की जीवनाची सफलता दीर्घायुष्याने नाही; तर जीवन जगण्याच्या शैलीने मोजली जाते. जीवनात सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारला तर अल्प आयुष्य देखील दिर्घ आयुष्याहून श्रेष्ठ होऊ शकतं. बाबा सज्जनसिंहजी म्हणजे एक मिशन होतं, एक सिध्दांत होता. बाबा सज्जनसिंहजी आजच्या या विस्तृत निरंकारी मिशनच्या पायाचा असा मजबूत शिलाधार होते; जो भले दिसत नसला तरी त्यावर मिशनची ही बहुमजली इमारत आज उभी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. बाबा सज्जनसिंहजींचा जन्म युगपुरुष बाबा अवतारसिंहजी व जगतमाता बुध्दवंतीजींच्या घरी १८ ऑगस्ट १९३२ रोजी पाकिस्तानच्या झेलम जिल्ह्यातील लतीफाल गावी झाला. शहनशाह बाबा अवतारसिंहजींच संपूर्ण कुटुंब समयाचे सद्‌गुरु बाबा बुटासिंहजींच्या चरणी पूर्णपणे समर्पित झालेलं होतं. असं म्हटलं जात, की गर्भवती स्त्रीच्या मन, वचन व कर्माचा प्रभाव तिच्या गर्भातील शिशुवर पडतो आणि तो प्रभाव शिशुवर संस्कार घडवण्यात सहाय्यक ठरतो. असंच काही बाबा सज्जनसिंहजींच्या बाबतीतही झालं. बाबा सज्जनसिंहजी बालपणापासूनच हुशार, सजग, विवेकी आणि प्रतिभावंत होते. बालपणापासूनच अभ्यासात त्यांना विशेष रुची होती. बालपणापासूनच ते हजरजबाबी होते. सज्जनसिंहजी साहसी, मेहनती आणि निष्ठेने काम करणारे होते. परमात्म्याने त्यांना सुंदर रंग-रुप तर दिलं होतंच, पण त्यांच्या राहणीतही थाट-माट होता. ते जी वस्त्रं परिधान करीत त्यातून सौंदर्याची झलक दिसे.

आजचं संत निरंकारी मिशनचं जे विशाल स्वरुप आहे ते तयार करण्याचं श्रेय बाबा सज्जनसिहजींना जातं. त्यांच्यात दूरदृष्टी होती. वय लहान होतं, पण डोळ्यात मात्र एका विशाल मिशनचं स्वप्न तरळत होतं. हे स्वप्न साकार करण्यासाठी आणि त्याला योग्य रुप देण्यासाठी वेळो-वेळी आपल्या मनातील भाव ते सद्‌गुरु बाबा अवतारसिंहजीसमोर ठेवत राहिले. सन १९४८ साली शहनशाहजींनी पहाडगंज, दिल्ली येथे संत-महापुरुषांसोबतच्या चर्चेत बोलता-बोलता म्हणाले,'मिशनचा प्रचार प्रसार आता विश्वभर होणार आहे, तेव्हा गुरसिखांना कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत असताना भक्तीचा आनंद प्राप्त करण्याची पध्दत शिकवण्यासाठी काही नियम व सिध्दांत (प्रण) यांचं पालन केलं पाहिजे. हे सिध्दांत असे पाहिजेत, की समस्त मानवजात या विशाल सत्तेशी जोडून विशालता धारण करील. या विषयावर तुम्ही सर्वजण विचार-विनिमय करुन उद्या पाच सिध्दांत व नियम लिहून आणा.' ही गोष्ट बालक सज्जनसिंहजींनी देखील ऐकली. डोक्यात विचारचक्र सुरु झालं. भविष्यात सद्‌गुरुचरणी कृपादृष्टी प्राप्त करणाऱ्यांमध्ये प्रत्येक जाती-धर्माचे, प्रांताचे, अनेक देशांतील विविध भाषा बोलणाऱ्या लोकांचे चित्र फिरु लागले.



दुसऱ्या दिवशी शहनशाहजी आणि सर्व संत महात्मांच्या समक्ष सज्जनसिंहजींनी पाच सिध्दांत वाचून दाखवले. हे सिध्दांत इतके परिपूर्ण होते, की ते सर्वांना खूप आवडले. प्रत्येकाने त्यांची ‘वाहवा’ केली. सर्वांनी त्यांच्या सिध्दांतांना संमती दिली. शहनशाह म्हणाले,‘आपण पाहिलचं आहे की, सज्जन तसा बालकच आहे, पण त्याचे विचार मात्र ‘बाबा’ सारखे असतात.आजपासून हेच पाच नियम संत निरंकारी मिशनचे पाच प्रण असतील. आणि प्रत्येक जिज्ञासूला ब्रह्मज्ञान घेण्यापूर्वी हे पाच प्रण स्वीकारावे लागतील. जो हे प्रण मानेल तोच विशालता प्राप्त करुन सुखमय जीवन व्यतीत करेल.’ अशा प्रकारे या पाच प्रणांच्या निर्मितीचे श्रेय बाबा सज्जनसिंहजींकडे जातं. त्यांनंतर त्यांच्या नावापुढे ‘बाबा’ शब्दही जोडला गेला.

आधार : ज्योती स्तंभ भाग : १

- अंकित चंद्रकांत जाधव.

## पत्र-पत्रिका विभागात तातडीने सेवादार पाहिजे

संत निरंकारी पत्र-पत्रिका विभागात पूर्ण वेळ सेवा करण्यासाठी संगणकीय क्षेत्रातील अनुभवी (निरंकारी) महापुरुषांची तातडीने आवश्यकता आहे. इच्छुक महापुरुषांनी आ. महात्मा चंद्रकांत जाधवजी (मोबाईल क्र. ९८२१६२८५५७) यांच्याशी संपर्क केल्यानंतर संगणकीय क्षेत्रातील तपशीलासह पत्र-पत्रिका विभाग (दादर सत्संग भवन, मुंबई) येथे प्रत्यक्ष भेटीसाठी उपस्थित रहावे.

सेवा : डी.टी.पी. पेजमेकींग, मराठी/इंग्रजी टायपिंग व मासिक पत्र-पत्रिकांशी संबंधीत इतर संगणकीय कार्ये.

-संपादक



## आगळावेगळा कल्पतरू

आपल्याला अनेक प्रकारे उपयोगी पडणाऱ्या झाडाला आपण कल्पतरु म्हणतो. खरं तर प्रत्येक झाड आपल्याला काही ना काही देतच असतं. त्याचा प्रत्येक भाग आपल्याला उपयोगी पडतो. प्रत्येक झाडावे त्याच्या प्रजातीनुसार फळं-फुलं येतात; परंतु एकाच झाडाला अनेक प्रकारची फळं आणि फुलं येतात, असं तुम्हाला कोणी सांगितलं तर तुमचा विश्वासच बसणार नाही. मुळात असं झाड असेल, अशी शक्यताच वाटत नाही; पण हे असं एक जादूई झाड आहे, ज्याला ४० प्रकारची फळं येतात.

‘ट्री ऑफ ४०’ या नावाने प्रसिध्द असणारं हे झाड न्यूयॉर्कमधील एका बागेत आहे. या झाडाला बोर, सीताफळ, पीच, आलुबुखार अशी अनेक जातींची फळं येतात. अमेरिकेतील व्हिज्युअल आर्ट्‌सचे प्राध्यापक असणाऱ्या वॉन एकेन यांनी हे झाड तयार केलं आहे. न्यूयॉर्कमधील बगिच्यांची पाहणी करताना एका बागेत त्यांना काही दुर्मिळ झाडं आढळली. वॉन यांनी हा बगिचा विकसित करण्यास सुरुवात केली आणि यात शेतीचे वेगवेगळे प्रयोग सुरु केले. हे करतानाच, झाडांच्या विविध प्रजाती संकरित करण्याचा छंद त्यांना लागला. या छंदातून ‘ट्री ऑफ ४०’ या झाडाची निर्मिती झाली.

वॉन यांनी अशा प्रकारची १६ झाडं तयार केली असून, अमेरिकेतील वेगवेगळ्या राज्यांमध्ये ती लावली आहेत. या प्रत्येक झाडाची किंमत साधारण २० लाख इतकी आहे. विविध प्रकारच्या फळांप्रमाणेच या झाडावर वेगवेगळी फुलंही येतात. कोणत्याही मौसमात हे झाड फळं-फुलांनी लगडलेलं असतं. या झाडावर फांदी कलम करुन, वेगवेगळी फलं व फुलांच्या प्रजाती संकरित केल्या जातात. हे झाड म्हणजे प्रगत शेतीतील उत्कृष्ट संशोधन मानलं जातं. ❖❖❖




अप्पर वर्धा धरण


लोअर वर्धा प्रकल्प



# वर्धा

मुख्यालय - वर्धा

क्षेत्रफळ - ६,३१० चौ. कि. मी.

तालुके - वर्धा, सेलू, हिंगणघाट, समुद्रपूर, देवळी, आर्वी, आष्टी, कारंजा (८)

नद्या - वर्धा, यशोदा, वेणा, बाकली, भदाडी, पोथरा.

खनिजे - नाहीत

शेतकी उत्पादने - ज्वारी, कापूस, गहू, भात, बाजरी, भुईमूग, हळद, मिरची, केळी, संत्री, मोसंबी व भाजीपाला.

धरणे - यशवंत प्रकल्प, अप्पर वर्धा व लोअर वर्धा प्रकल्प

विशेष माहिती -

★ १९३४ साली महात्मा गांधी वर्ध्याला आले. जमानालालजी बजाज यांच्या सूचनेवरुन त्यांनी सेगाव ही आपली कर्मभूमी निवडली. त्याचे नाव सेवाग्राम ठेवले. येथील या बापू कुटीतून महात्मा गांधींनी स्वातंत्र्य आंदोलनाची सुत्रे हलविली.

★ पवनारच्या परमधाम आश्रमाची स्थापना आचार्य विनोबा भावे यांनी १९३७ साली केली.

★ वर्धा शहरात मगन संग्रहालय आहे. या संग्रहालयाचे उद्घाटन महात्मा गांधींच्या हस्ते ३० डिसेंबर, १९३८ रोजी झाले. हे संग्रहालय खादी व ग्रामोद्योग वस्तूंसाठी प्रसिध्द आहे.

★ वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मुख्यालय व अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ ही संस्था आहे.

★ महाराष्ट्रातील पूर्ण विद्युतीकरण झालेला पहिला जिल्हा म्हणून वर्धा जिल्हयाची ओळख आहे.

★ वर्धा येथे हत्तीरोग संशोधन केंद्र कार्यरत आहे.

- रंजना भांगरे, मुलुंड (पूर्व)

❖❖❖



बापु कुटी (सेवाग्राम)


परमधाम आश्रम

# पाणी-पाणी



एक एक थेंबासाठी
हैराण असे मानव प्राणी
पशू-पक्ष्यांची स्थिती असे
याहून केविलवाणी

आटल्या विहिरी पाणवटे
ओढ्यातील सुकले झरे
शमवितील कैसी तहान अपुली
ही चिमणी पाखरे

करा आज हा प्रयास सारे
मित्रांनो तुम्ही मिळुनी
नाते पशू-पक्ष्यांशी तुमचे
राहील अखंड जुळूनी

छोट्या छोट्या डब्यातुनी
ठेवा पाणी झाडावरती
प्रयास करा असा जरासा
चिमण्या पक्ष्यांचे जीव वाचती

अपुल्या घरासभोवती
ठेवून द्या थोडे पाणी
सरपटणारे जीव-माकडे
तृप्त होती पिऊनी





# सामान्य ज्ञान



१) १ जुलै १९९८ रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन कोणता जिल्हा निर्माण करण्यात आला ?
अ) मालेगाव ब) नंदुरबार क) जळगाव ड) कळवण

२) महाराष्ट्रात चादरी उत्पादनासाठी कोणते ठिकाण प्रसिध्द आहे ?
अ) सावंतवाडी ब) यवतमाळ क) कोल्हापूर ड) सोलापूर

३) 'अमेरिका' या देशाचा स्वातंत्र्यदिन कोणत्या तारखेला येतो ?
अ) ४ जुलै ब) ५ जुलै क) ६ जुलै ड) ७ जुलै

४) लो. टिळकांनी भगवद्गीतेतील कोणत्या भागावर आधारित 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला ?
अ) ज्ञानयोग ब) कर्मयोग क) भक्तियोग ड) सांख्ययोग

५) जुलै महिन्याचा शेवटचा रविवार हा दिवस कोणता दिवस म्हणून साजरा करतात ?
अ) जाग. हास्यदिन ब) जाग. मैत्रीदिन क) जाग. पितृदिन ड) जाग. पालकदिन

६) देहू व आळंदी ही तीर्थक्षेत्रे कोणत्या नदीकाठी वसली आहेत ?
अ) चंद्रभागा ब) गोदावरी क) इंद्रायणी ड) कृष्णा

७) पवनारच्या आश्रमाची स्थापना कोणी केली ?
अ) विनोबा भावे ब) म. गांधी क) महर्षी दयानंद सरस्वती ड) साने गुरुजी

८) इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (EVM) जास्तीत जास्त किती मतांची नोंद ठेवू शकते ?
अ) १८०० ब) ३८४० क) ५३५० ड) २८४५

उत्तरे इतरत्र

९) रामायणातील सुलोचना ही व्यक्तिरेखा कोणाची पत्नी होती ?
अ) इंद्रजीत ब) जांबुवंत क) नल ड) सुग्रीव

१०) 'कृष्णद्वैपायन' असे कोणाला म्हटले आहे ?
अ) अर्जुन ब) सांदिपनी ऋषी क) महर्षी व्यास ड) कर्ण





# पांढऱ्या पोटाचा निलिमा

निळसर छटांचं सुंदर लेणं लाभलेला हा पांढऱ्या पोटाचा निलिमा पक्षी. हा पक्षी निलिमा या पक्ष्याच्या प्रजातीतलाच, परंतु याच्या पोटाकडील भाग हा शुभ्र पांढऱ्या रंगाचा असतो. विशेषतः पश्चिम घाटात आढळणाऱ्या या चिमुकल्या सुंदर पक्ष्याला इंग्रजीत व्हाइट बेलीड ब्लू फ्लायकॅचर असं म्हणतात. निसर्गाच्या हिरव्यागार पार्श्वभूमीवरील याचं निळसर रुप खरंच खूप मनमोहक दिसतं. भारतात सर्वत्र आढळणारा हा पक्षी हमखास पहायचा असेल तर कर्नाटक राज्यातील गणेश गुडी वा दांडेली टेकडी या भागात जायला हवं. महाबळेश्वरपासून निलगिरी पर्वतराजी ते दक्षिणेला केरळ आणि तामिळनाडूमध्येदेखील याचं वास्तव्य दिसून येतं.

हा गोंडस छोटासा पक्षी फिकट निळ्या रंगाचा असतो तर पोटाकडील भाग हा पांढऱ्या रंगाचा असतो. याचे पाय व चोच काळ्या रंगाची असते. नर व मादी पक्ष्यामध्ये मात्र या रंगात खूपच फरक दिसून येतो. नर हा सुंदर निळ्या पाठीचा असतो तर मादी करड्या-तपकिरी रंगाच्या पाठीची असते. साधरणपणे पाच इंच लांबीचा हा पक्षी घनदाट जंगल असलेल्या प्रदेशातच आढळतो. हा पक्षी अतिशय शांत व भित्र्या स्वभावाचा असतो. यामुळेच सहसा मनुष्यवस्तीत हा दृष्टीस पडत नाही. हा अजिबात माणसांच्या सान्निध्यात येत नाही, यामुळे याचे फोटो काढणंही मुश्किल असतं. झाडांच्या सावलीत चुपचाप राहणारा हा निलिमा पक्षी अगदी हळू खालच्या पट्टीत आवाज करतो.

किडे, अळ्या, फुलांमधील रस, छोटे कीटक हे त्याचं मुख्य खाद्य आहे. हा 'फ्लायकॅचर' वर्गातील पक्षी असून हवेतल्या हवेत उडणारे कीटक सहजपणे मटकावतो.

हा पक्षी कायम जोडीने एकत्र राहतो. झाडाच्या एखाद्या छोट्या भेगेत किंवा ढोलीमध्ये मऊ गवत, काड्या, काटक्या व हिरवी पानं वापरुन हे घरटं तयार करतात. हे घरटं नर व मादी दोघे मिळून तयार करतात. प्रजननाच्या काळात मादी तीन ते चार अंडी घालते, अंड्यातून बाहेर आलेल्या पिल्लांचे संगोपन व सरंक्षण नर व मादी दोघे मिळून करतात.

संग्राहक - अंकित जाधव




# बाल संत समागम (मुंबई क्षेत्र) २०१९




















# बाल संत समागम (मुंबई क्षेत्र) २०१९


























# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) ड
३) अ
४) ब
५) ड
६) क
७) अ
८) ब
९) अ
१०) क

## शब्दकोडे १८०

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ आ | फ्रि | का | | २ श्री | लं | ३ का |
| त्या | | | ४ पा | | | ळा |
| | ५ क | पि | ल | दे | ६ व | |
| | ल | | घ | | ७ की | ड |
| ८ ज | वा | ९ ह | र | १० ला | ल | |
| य | | ड | | ड | | ११ झे |
| १२ ते | १३ वी | स | | १४ का | १५ बू | ल |
| | १६ स | न | ई | | टा | |

।। १ तू ही निरंकार ।।

**कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।**
**कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।**



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

# महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

**सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है**
**पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है**

१९१, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


।। तुह्री निरंकार ।।



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील
कुशल रा. पाटील